# आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक,
# राष्ट्रीय आरोग्य अभियान

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

NHM राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र

दुरध्वनी - ०२२ - २२७१७५००
फॅक्स - ०२२ - २२६४२९५५
E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com

आरोग्य भवन, ३रा मजला,
सेंट जॉर्ज रूग्णालय आवार, पी. डिमेलो रोड,
सीएसटी जवळ, फोर्ट, मुंबई ४००००१


जा.क्र.राआसो/CHO/एकवेळ बदली/मार्गदर्शक सुचना/........../२५
दिनांक- १४/०६/२०२५ २७६७१ - २८७५१

प्रति,
उपसंचालक आरोग्य सेवा परिमंडळे........ सर्व,
जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद...सर्व.

विषय- समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या आंतर जिल्हा विनंती बदलीबाबत मार्गदर्शक सूचना.

संदर्भ:-१. अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांचे क्र.संकीर्ण १०२४/ प्र.क्र.५५६/एनएचएम दिनांक २८.०५.२०२५ रोजीचे पत्र.
२. सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-
३. या कार्यालयाचे जा.क्र.राआसो/CHO/एकवेळ बदली/१९४४७-५२७/२५ दिनांक २९.०५.२०२५ रोजीचे पत्र.
४. संचालक आरोग्य सेवा यांचे पत्र क्र. राआसो/CHO/बदली/१९४४७-५२७/२५ दि. ०२.०६.२०२५
५. शासन पत्र क्र. संकीर्ण/१०२४/प्र.क्र.५५६/एनएचएम दि. २८.०५.२०२५

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या एकवेळच्या विनंती बदल्याबाबत मार्गदर्शक सूचना खालील प्रमाणे देण्यात येत आहेत.

अ) आंतरजिल्हा बदली वेळापत्रक

| अ.क्र. | बाब | दिनांक |
|---|---|---|
| १ | बदलीस पात्र ईच्छुक उमेदवारांची जेष्ठता यादी/रिक्त पदे/रिक्त बिंदू प्रसिध्द करणे. | दि. १७.०६.२०२५ |
| २ | हरकती/आक्षेप मागवणे. | दि. १९.०६.२०२५ सायंकाळी ५.०० वा. पर्यंत. |

| | | |
|---|---|---|
| ३ | अंतिम बदलीस पात्र ईच्छुक उमेदवारांची जेष्ठता यादी/रिक्त पदे/रिक्त बिंदू प्रसिध्द करणे. | २०.०६.२०२५ |
| ४ | व्ही.सी. द्वारे समुपदेशन (जिल्हा मुख्यालय) | दि. २३.०६.२०२५ ते २९.०६.२०२५ |
| ५ | आदिवासी/अतिदुर्गम/दुर्गम भागात इच्छुक उमेदवारांचे समुपदेशन व बदली आदेश निर्गमित करणे. | दि. २३.०६.२०२५ |
| ६ | दुर्धर आजार, अपंग व पती-पत्नी एकत्रिकरण यांचे समुपदेशन व बदली आदेश निर्गमित करणे. | दि. २४ व २५.०६.२०२५ |
| ७ | अन्य इतर यांचे समुपदेशन व बदली आदेश निर्गमित करणे. | दि. २६ व २७.०६.२०२५ |
| ८ | उर्वरित इतर समुपदेशन | दि. २८ व २९.०६.२०२५ |

ब) आंतरजिल्हा बदली मार्गदर्शक सुचना

१) ज्या उमेदवारांनी विहित कालावाधीत, विहित नमुन्यात आंतर जिल्हा बदलीबाबत अर्ज सादर केला आहे त्यांनाच समुपदेशनाबाबत विचार करण्यात येईल.

२) बदली पात्र उमेदवारांची जेष्ठता यादी/रिक्त पदे/रिक्त बिंदू नामावली राष्ट्रीय आरोग्य अभियान यांच्या संकेतस्थळावर व जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या संकेतस्थळावर व कार्यालयातील सुचनाफलकावर प्रसिध्द करण्यात यावी.

३) बदली पात्र उमेदवारांची जेष्ठता यादी/रिक्त पदे/रिक्त बिंदू याबाबतचे आक्षेप राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या chotransfer2025@gmail.com या ई मेल आयडीवर दिनांक १९.०६.२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत पाठविण्यात यावे.

४) समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या आंतर जिल्हा बदली प्रक्रिया समुदपदेशनाने जिल्हा मुख्यालयी दिनांक २३ जून २०२५ ते २९ जून, २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात येणार असून त्याकरीता बदलीस इच्छुक उमेदवारांना बसण्यासाठी कॉमन हॉलची व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी. समुपदेशनाच्या वेळी सभागृहात ऑनलाईन व्ही.सी. ची बैठक व्यवस्था व व्हीडीओ शुटींग उपलब्ध करण्यात यावी.

५) ऑनलाईन व्ही.सी.करीता लॅपटॉप/डेक्सटॉप, डिसप्ले स्क्रीन/प्रोजेक्टर, माईक, स्पीकर, कॅमेरा ( एचडी झुम इन झुम आऊट ), इंटरनेट (कमीत कमी २० एमबीपीएस स्पीड) व पॉवर बॅक-अप ची व्यवस्था करावी.

६) जिल्हयातील आंतरजिल्हा बदली पात्र उमेदवारासोबत जिल्हा आरोग्य अधिकारी व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी सकाळी ९.०० पर्यत उपस्थित रहतील व त्यांची उपस्थिती पत्रक या कार्यालयास सकाळी ९.३० वाजता पाठवावे त्यानंतर सकाळी १०.०० वाजता समुपदेशनबाबतची कार्यवाही सुरु होईल याची दक्षता घ्यावी.

७) उपसंचालकस्तरावर उपसंचालक आरोग्य सेवा व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी सकाळी ९.०० पर्यंत उपस्थित रहावे व सकाळी १०.०० वाजता समुपदेशनबाबतची कार्यवाही सुरु होईल याची दक्षता घेण्यात यावी.

८) समुदपदेशनाच्या वेळेस जिल्हा निहाय रिक्त पदे/रिक्त बिंदू प्रर्वग तसेच आदिवासी व दुर्गम भागातील उपकेंद्राची माहिती घेवून हजर रहावे.

९) जिल्हास्तरावर बदलीपात्र समुदाय आरोग्य अधिकारी यांचे उपस्थिती पत्रक ठेवण्यात यावे. व त्यावर उपस्थितांची स्वाक्षरी घेण्यात यावी.

१०) आंतरजिल्हा बदली ही संपूर्णपणे प्रशासकीय स्वरुपाची बाब असल्यामुळे कोणत्याही अधिका-याने राजकीय दबाव वापरल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९८१ मधील नियम २३ चा भंग केल्याम्हणून ती कृती शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र राहील.

११) प्रत्येक समुदाय आरोग्य अधिकारी यांनी आंतरजिल्हा बदली स्विकृत केल्यास संमतीपत्रावर त्याची स्वाक्षरी घेण्यात यावी.

१२) समुपदेशनाच्या वेळी रिक्त पदांची, बदली पात्र समुदाय आरोग्य अधिका-यांची सेवा ज्येष्ठतेची माहिती अदयावत ठेवण्यात यावी.

१३) इच्छूक आंतरजिल्हा विनंती बदली पात्र करण्यात येणा-या समुदाय आरोग्य अधिका-यांची माहिती जिल्हा स्तरावर अदयावत ठेवण्यात यावी..

१४) मॉक ड्रील दिनांक २२.०६.२०२५ रोजी घेण्यात येणार असल्याने उपसंचालक आरोग्य सेवा परिमंडळे व जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयातील संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी उपस्थित रहवे.

१५) समुपदेशनाने बदलीच्या वेळेस १०डिसेंबर २०२४ च्या शासन निर्णयानुसार समुदाय आरोग्य अधिकारी यांचा कार्यरत पदावरील आंतरजिल्हा बदलीपात्र सेवा कालावधी ३ वर्षांचा राहिल. ( दि. १२.०६.२०२५ पर्यंत)

१६) शासन प्रचलित धोरणानुसार पति-पत्नी एकत्रिकरण व दुर्धर आजाराने कुटुंबातील व्यक्ति आजारी असल्यास त्यांना विनंतीनुसार बदलीमध्ये प्राधान्य देण्यात येईल, परंतु आजाराबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र जिल्हा शल्य चिकित्सकांनी प्रमाणित केलेले असावे.

प्रति. DHO यांना

तदनंतर अन्य समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या आंतरजिल्हा बदल्याबाबत त्यांचा सेवाजेष्ठतेनुसार समुपदेशनाची कार्यवाही करण्यात येईल.

१७) प्रत्येक दिवशी बदलीस पात्र सर्व समुदाय आरोग्य अधिकारी यांना बोलवावे जिल्हानिहाय अदयावत रिक्त जागा यादी सुचना फलकावर लावावी.

१८) समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या एकूण पदांच्या आरक्षणाच्या समतोल राखून बिंदुनामावली सामाजिक आरक्षण विचारात घेवून समुपदेशनाने आंतरजिल्हा विनंती बदली करण्यात येईल.

१९) काही अपरिहार्य कारणास्तव समुपदेशनात बदल करण्याचे सर्व अधिकार राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत समितीस राहतील.

( डॉ. नितीन अंबाडेकर)
संचालक
आरोग्य सेवा आयुक्तालय मुंबई.

प्रत माहीतस्तव सादर -

- मा. सचिव -१ सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय मुंबई
- मा. सचिव -२ सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय मुंबई
- मा. आयुक्त,आरोग्य सेवा तथा अभियान संचालक,राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई.
- सहसंचालक-राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई.
- मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद ( सर्व )
- उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळ.